IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक कार्य

**प्रा. डॉ. रविंद्र इचे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,
छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,
आसेगाव पुर्णा, जि. अमरावती

---

महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होऊन गेले त्यातील अमरावती जिल्हातील डॉ. पंजाबराव देशमुख होते. महाराष्ट्रातील सुधारकांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील, यांचे नाव शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल सर्व परिचीत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख भारतीय कूषक व कृषीवर प्रेम करणारे होते डॉ. पंजाबराव देशमुख पुरानाततल्या काल्पनिक कामधेनुपेक्षा ते बकरी ,गायीवर प्रेम करीत ते बकरीला गरीबांची कामधेनू मानत आणि कोबडीला ते कल्पतरू समजत ते म्हणत की मानवी जीवनातली कृषी हीच आध्य व सर्वात श्रेष्ठ संस्कृती आहे. या कृषी संस्कृतीनेच मानवी जीवनाची वस्तुनिष्ठ मूलभूत मुल्ये निर्माण केलीत कृषी शिवाय मानवी जिवनाच्या विकासाचे व संभ्यतेचे सिध्दांत कोल आहेत. पृथ्वीवरील मानवी संस्कृती व सभ्यतेचा विकास कृषीतूनच झाला असा त्यांचा प्रगल्भ विचार होता. इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असतांना त्यांनी तेथील शैक्षणिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतीक व कृषी क्षेत्राचा शुक्ष्म अभ्यास केला. पाश्चात्य विज्ञानाने आपली प्रगती करून घेणे शक्य आहे. हे त्यांनी तेव्हा हेरले व ते प्रत्यक्षात आपणण्यासाठी शिक्षण हे त्यावरील प्रभावी हत्यार आहे असे त्यांनी मानले. भारताचे कृषी मंत्री असतांना त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना व निर्णय घेतले त्याचप्रमाणे देशामध्ये सामाजिक सुधारना घडवून आनण्याच्या दृष्टीने जातीयतेचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न त्यांनी स्वत:च्या जीवनापासून सूरू केला. अंबादेवीचे मंदिर बहूजनांसाठी खुले करून जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. धर्मग्रंथासंबंधी त्यांनी जे अध्ययन केले त्याचा परिणाम त्यांच्या विचारावर झालेला होता. संस्कृतीच्या मुल्यांची जोपासना करणे हे मी माझे कर्तव्य समजतो असे ते म्हणत. आपल्या विचाराला अनुसरूण त्यांची काम करण्याची शैली अविस्मरनीय होती प्रस्तुत शोध निबंधात शेकऱ्यांच्या दृष्टीने त्यांनी केलेले कार्य अभ्यासन्याचा प्रयत्न केलेला आहे. दुय्यम स्त्रोत म्हणून त्यांच्यावर प्रकाशीत झालेल्या ग्रंथाचा वापर केलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म अमरावती जिल्हातील पापड या गावी 27 डिसेंबर 1898 ला एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यामुळे शेतीशी निगडीत असलेल्या समाजाचे प्रश्न त्यांनी अत्यंत जवळुन पाहीले होते. पंजाबराव देशमुखांची शिक्षण विषयक आवड व झेप लक्षात घेता त्यांनी शिक्षण घेवून खुप मोठे व्हावे ही आई वडीलांची इच्छा होती पण विदेशात शिक्षणाला पाठविण्यासाठी पैशाची सोय नव्हती तेव्हा वडीलांनी चंदनमल सेठ कडे शेती गहाण ठेवून पैशाची तरतुद केली याचाच परिणाम कि काय बालवयातच त्यांना कष्टकरी शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची कल्पना येऊन त्याचा परिणाम त्यांच्या भावी जिवण

कार्यावर झालेला आपल्याला पाहायला मिळतो त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात डी.फिल ही पदवी मिळवली त्यांनी "वैदिक" वाडमयातील धर्माचा उगम व विकास " यावर प्रबंध लीहून पी.एच.डी. पदवी मिळवली " इग्लंडमध्ये त्यांनी बार- ॲट- लॉ ची पदवी मिळवून ते 1926 ला भारतात परत आले. तेव्हा त्यांना विदर्भातील शेतकऱ्यांच्या परिस्थितींची जाणीव होती दु:ख दारिद्र्याने ग्रासलेले, कर्जाच्या डोंगराच्या भाराखाली वाकलेल्या आज्ञानाच्या अंध:कारात लोळत पडलेल्या शेतकरी वर्गाला जागृत करायचा असेल तर प्रथम त्यांला शिक्षित केले पाहिजे तेव्हाच त्याला सभोवताली असलेला विश्वाचे ज्ञान घडेल त्याला खऱ्या सामर्थाची जाणीव होईल त्यासाठी त्यांनी शिक्षण घेतले पहिजे, सोयी नसतील तर त्या उपलब्ध करून दिल्या पहिजे त्यादृष्टीने सुरूवातीला त्यांनी पावले उचलले. अमरावती जिल्हा कॉन्सीलचे अध्यक्ष असताना त्यांनी शिक्षण सक्तीचे केले. शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देता यांव्या म्हणून शिक्षण कर वाढवला. शिक्षणाचे महत्व पटवून दिले. कारण शिक्षण हे शेतकऱ्यांच्या उध्दाराचे साधन आहे असे त्यांनी मानले होते. व ते सत्यात उतरविण्याचे काम शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन केलेले दिसुन येते.

**कृषी शिक्षण :**

वऱ्हाडाचे शिक्षण व कृषी मंत्री असतांना नागपूरचे कृषी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फि द्यावी लागत नसे विद्यार्थ्यांच्या सर्व सुखसोईचा खर्च शासनच करीत असे पण ज्यांच्या आईवडीलांची पिढ्यान –पिढ्या कधी कंबरेला विडा खोचला नाही त्यांची मुल इथे शिक्षण घेत होती त्यांनाच शासनाच्या उच्च नौकऱ्या मिळायच्या हे जेव्हा डॉ. पंजाबरावांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी तेथील परिस्थिती बदलुन टाकली त्यांनी तेथे इतर महाविद्यालया प्रमाणे फी सुरू केली व शेतकरी जमातीतील विद्यार्थ्यांसाठी तेथे प्रवेश मिळण्याची व्यवस्था केली व त्यांना तांत्रिक पध्दतीने शेतीचे प्रशिक्षण व त्याआधारे उच्च नौकरीसाठी संधी खुली केली.

**शेतकरी वर्गाची कापूस बाजारात होणारी पिडवूणक थांबविली** :

खेड्यातील शेतकरी कापूस विकण्यासाठी अमरावतीच्या बाजारपेठेत यायचा तो विकल्यानंतर दहीसाथीतीतील कसबिनीच्या घरी संगीताची मैकिल घ्यायचा व तिच्यावर पैश्याचा पाऊस पाडायचा त्याच प्रमाणे खुप काबाडकष्टाने कापूस पिकवायचा पण त्याचे मोजमाप अमरावतीच्या मारवाडी व्यापाऱ्यांच्या हातात प्रतवारी, भाव सुध्दा तोच ठरावायचा अडते, दलाल, आणि व्यापारी त्यांच्याच मर्जीतील असायचे शेतकरीत मात्र , अडाणी व बिनहिशोबी 1930 साली डॉ. देशमुख वऱ्हाडचे मंत्री झाल्यानंतर कापूस बाजारांच्या कार्यकारी मंडळात खेड्यातून निवडून येणाऱ्या शेतकरी प्रतिनिधीचा समावेष होऊ लागला. 1935 ला पंजाबराव देशमुख स्वत: अमरावती कापूस बाजार समितीचे अध्यक्ष बनले व कापूस बाजारात सुधरणा झाल्या. मापाई करण्यासाठी तीनपाणी पावती पुस्तके आणि त्यावर अडत्या , खरीदीदार व कापूस विकणारा शेतकरी यांच्या सह्य अनिवार्य केल्या कापूस विक्रीच्या व्यवहारात कुठेही गफलत होणार नाही.

दलालीचे परवाणे कष्टकरी समाजातील लोकांना घेता यावे म्हणून काही बंधने शिथील करण्यात आली. त्यामुळे दलालाच्या संख्येत शेतकऱ्यांच्या हितचिंतकाची भर पडली. त्यांच्या झोपण्याची, गाड्या सोडण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे ग्रामीण मुलांच्या शिक्षाणासाठी कापूस बाजार समितीच्या निधीतुन शिक्षण संस्थांना देणग्या देण्याची तरतुद केली या निधीतुन श्री शिवाजी शिक्षण संस्थेला पैसा पुरवण्यात आला.

**सावकारी कर्ज व सहकारी बँकांच्या कचाट्यातुन शेतकऱ्यांची सुटका :**

वऱ्हाडात सावकारी हा धनिकाचा व्यक्तिगत व्यवसाय होता सावकारी करनारे दुसरेही सहकारी माध्यम होते. वऱ्हाडात सहकारी बँक निघाल्या होत्या पण सरकारी नोकरी करणारा पांढरपेशा मध्यम वर्ग आपल्या ठेवी सहकारी बँकेत ठेवत असे त्यामुळे सहकारी बँकां त्याचा वर्गाच्या होत्या. त्यांच्यातुन संस्थांचे संचालक मंडळ बनत असे. सावकाराच्या अन्यायपूर्ण वागणूकीमुळे बहुसंख्य शेतकरी कर्जासाठी या बँकेकडे धाव घेत होते. पण कर्जाच्या मोबदल्यात त्यांना त्यांची जमीण गहान ठेवावी लागत असे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लवाद कोर्टाच्या कायद्यात हा दोष राहूण गेला होता कि सहकारी बँकेचा कर्ज व्यवहार या कायद्याच्या कक्षेत येत नव्हाता. त्यामुळे बँकेच्या तावडीतुन शेतकऱ्यांना काढणे गरजेचे होते. कर्जदारातुन काही कर्जदार बँकेचे मतदार होत असत परंतु ग्रामिण भागातील लोकांना बँकेच्या कायद्याचे ज्ञान नव्हते यावर उपाय म्हणून स्वत: पंजाबराव देशमुख मोठ्या शिताकीने कायदेशीर सभासद झाले कालांतराने बँकेच्या संचालक मंडळावर 27 पैकी डॉ पंजाबराव देशमुख यांचे 18 उमेदवार निवडून आले. आणि आर. एम. खरेच्या विरोधात 95 टक्के मतांनी विजयी होऊन डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती सहकारी बँकेचे अध्यक्ष बनले.

1934 ला अमरावतीची सहकारी बँक जरी डॉ पंजाबरावांच्या ताब्यात आली परंतु ज्याच्या जुन्या ठेवी बँकामध्ये होत्या त्या ठेवी काढून घेण्याचा सपाटा त्यांनी लावला होता कारण आता त्यांचे बँकेच्या व्यवहारात काहीच चालत नव्हते तेव्हा बँक कोंडीत सापडते कि काय अशी अवस्था झाली तेव्हा आष्टेकर हे माधव देशपांडे दि सेंट्रल पॉव्हेन्सेस ॲण्ड बेरार कॉ.ऑप बँक ली. चे अध्यक्ष होते तेव्हा स्वत: पंजाबराव देशमुखांनी माधवराव देशपांडेंना बॅकेची खरी अडचन समजावून सांगितली व नागपूर बॅकेकडून चार लक्ष रू कर्ज घेतले व ठेविदारांच्या ठेवी परत केल्या.

प्रश्न उरला होता तो गहान पडलेल्या शेतीचा तेव्हा डॉ. पंजाबराव देशमुखांनी ही समस्या त्यावेळेचे प्रांतिक सरकारच्या सचिवाना ही समस्या समजावून सांगितली तेव्हा एक चौकशी समिती नेमण्यात आली ज्या गावाची जमीण जप्त झाली तेथील कर्जदाराचा विचार घेवून शेतीची जास्तीत जास्त किंमत ठरवण्यात आली व त्यात शक्य तेवढी सुट देऊन कर्जाचा निर्वाडा केली. लीलावात हर्रास केलेल्या मालमत्तेची खरीखुरी किंमत ठरविण्यात येत होती. कर्जाचे लहानात लहान रक्कमेचे दिर्घ मुदतीचे हप्ते पाडुन गहान पडलेली शेती

त्यांच शेतकऱ्यांना परत करण्यात येई. शेतकऱ्याची शेती हिसकावून घेण्यात बँकांनी नैतीक गुन्हा केला. याची जाणीव पण डॉ. पंजाबराव देशमुखांनी शासनाला करून दिली व खाजगी सावकाराच्या दृष्टीकोण आणि बँकेचा दृष्टीकोन हा सारखाच असता कामा नये ही गोष्ट शासन कर्त्याच्या लक्षात आणून दिली.

**राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना :**

भारतीयांचे जिवनमान उंचावण्यासाठी रार्ष्टीय स्तरावर प्रयत्न करण्याची निकड लक्षात घेता राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना झाली. डॉ. पंजाबरावांनी ही जबाबदारी जे.एस.चव्हान यांच्याकडे दिली. ही संस्था त्यांनी 1958 ला स्थापन केली. ही बातमी पंजाबराव देशमुखांनी जपानमध्ये भरलेल्या अधिवेशनात दिली व अश्या प्रकारच्या संस्थांची निर्मिती आवश्यक आहे असे मत तेथे सर्वांचे होते. पहिल्याच वर्षी युरोपातील बाजारात भारतातील डाळी निर्यात केल्या . खजूर व अमोनियम सल्फेटची परदेशातून खरेदी केले. ज्युटापासून झालेल्या वस्तु रशियाला पाठवल्या त्याच्या मोबदल्यात रशियातुन अमोनियम सल्फेट मिळवले . इरान ,इराक मधून खजुराची आयात केली. विदेशातुन कोबीचे उत्कृष्ठ बि मिळविले ते भारतातील बागाईतदारांना स्वस्त दरात पूरवले अशा प्रकारे विविध मालाची देवाघ घेवाण यातुन झाली. ती देशाच्या विकासासाठी प्रेरक ठरली.

**भारत कृषक सहकारी अधिकोष :**

भारतात शेतकऱ्यांच्या मालकीची शेतकऱ्यांनीच चालविलेली एक बँक असावी ही कल्पना त्यांनी 1954 साली श्रीनगरच्या कृषक मेळाव्यात मांडली होती या अधिवेशनात स्थापनेला अनेक राजकीय लोकांनी विरोध केला कारण, डॉ. पजाबराव देशमुख यांचे वाढलेले कार्य पाहता देशमुखांनी स्थापन केलेल्या संस्था बलवान झाल्या तर भारताची सत्ता त्यांच्याकडे जाईल असा समज विरोधकांनी निर्माण केला या प्रकरणाच्या फाईल पंडित जावाहरलाल नेहरूनकडे 4 महिने पडून होत्या तेव्हा त्यांच्या अनुमतीची वाट न पाहता हा अिधकोष त्यांनी कायदेशीर रजिस्टर केला या अधिकोषाने सुरवातीलाच 1,33,000 हजाराचा निधी उभा केला महाराज राजा यादवेंद्रसिंग या अधीकोषाचे पहिले अध्यक्ष होते आणि डॉ. पंजबाराव देशमुख उपाध्यक्ष होते. या अधिकोषाने शेतकऱ्यांच्या जिवनात विकासाची नवी आशा निर्माण केली.

**युवक कृषक समाज :**

1961 मध्ये कृषक युवकांना एक प्रतिनिधीक मेळावा दिल्ली येथे भरला होता 1964 मध्ये मलायातील कॉलीलम्रपूर येथे आंतरराष्ट्रीय युवकांची दूसरी बैठक भरली. भारताच्या शासनाकडून या काळात या कामासाठी मदत मिळाली नाही. युवक कृषी समाजाचे भारतातील 100 शेतकऱ्यांची मुले कृषी अभ्यासासाठी परदेशी पाठवली त्याप्रमाणे परदेशी कृषक युवक भारतात आले त्यांची पर्यटनाची व वास्तव्याची व्यवस्था कृषक समाजानेच केली. युवक कृषक समाजाने भारतात शेतीवर राहणाऱ्या युवक

कृषकांच्या प्रशिक्षणाची , अमरावती ,अहमदाबाद, बंगलोर व रेवा या ठिकाणी केंद्र उघडली या केंद्रातून त्यांच्या शेतीचा अभ्यास पूर्ण करून घेतला. हे केंद्र कृषीच्या ज्ञानाचे आंतरराष्ट्रीय आदानप्रदान करण्याचे कार्य करते व त्यातुन भारतीय शेतीत अधिक विकासीत करण्याचा हेतू बाळगते.

**कृषी यंत्र संघटना :**

भारतीय शेतीचे आधुनिककिकरण केल्याशिवाय अधिक उत्पादन होउ शकत नाही याची खात्री पंजाबरावांना होती म्हणून 1956 ला डॉ. पंजाबराव देशमुखांच्या पुढाकाराने ही संघटना स्थापन झाली . डॉ. पंजाबराव देशमुख हे या संघटनेचे अध्यक्ष होते. शेतकरी वर्गात शेतीच्या यांत्रिकी करणाबाबत आवड निर्माण करणे आवश्यक आहे कारण आधुनिक शेती विकासामध्ये यांत्रिकीकरणाला महत्व आहे. त्याशिवाय अपेक्षीत विकास शक्य नाही. ही बाब लक्षात घेता संघटनेत त्यांनी आधुनिक यंत्रांच्या उपयोगाचे प्रशिक्षण सूरू केले त्यासाठी त्यांनी कृषी यंत्राची मोठमोठी प्रदर्शने भरवली.

**कुक्कुटपालन संस्था :**

डॉ. पंजाबराव देशमुखांनी राष्ट्रीय स्तरावर कुक्कुटपालनाच्या व्यवसायाला प्रोत्साहन दिले भारतातील पोष्टीक आहाराची समस्या कोंबड्याच्या अंड्याचे उत्पादन वाढविल्याने सोडवता येईल अशी त्याची खात्री होती. दिल्लीच्या त्यांच्या निवास्थानी त्यांनी स्वत: कोबड्या पाळल्या होत्या प्रचंड प्रमानावर यंत्रांच्या सहाय्याने कोंबडीची अंडी उबवीण्याची शासनातर्फे त्यांनी व्यवस्था केली. भारतातील गुरांच्या दवाखान्यातुन याचा त्यांनी झापाट्याने विस्तार केला. भारतीय कॉग्रेसच्या अधिवेशनातूनही त्यांनी कुकुट पालनाची प्रदर्शनी भरवली. इंदोरच्या अधिवेशनात फार मोठे प्रदर्शन भरवले होते गाई- म्हशी साठी कृत्रीम रेतन आणि कोंबड्या बदकाच्या वाढीचा डॉ. पंजाबराव देशमुखांना हव्यास लागला होता.तो शेतीला पर्यायी व पूरक व्यवसायाची जोड म्हणून

1963 ला ते नॉर्वे व स्वीडनमध्ये पर्यटनाकरीता गेले. नॉर्वेच्या मच्छीबाजारत त्यांनी आठ दिवस घालुन विविध माशांची माहिती घेतली कारण याला भारतात आपण चालना देऊ शकतो या प्रभावी विचाराने त्यांनी भारतात आल्यावर तलाव पाणी संचयाच्या ठीकाणी मस्त्योत्पादनाला चालना दिली. मत्स-बिजोत्पादन व त्यांचे वितरण या कामाला त्यांनी प्रात्साहन दिले.

**कृषी उत्पादनाचा आंतरराष्ट्रीय संघामध्ये कार्य :**

International Federation of Agriculture Producfers(IFAP) ही जगातीक संघटना आहे. भारत कृषक समाज या संघटनेचा सदस्य आहे 1963 साली या संघाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पंजाबराव देशमुखांची अविरोध निवड झाली. हा सन्मान म्हणजे संपूर्ण भारताच्या कृषक नेतृत्वाला जागतिक संघटनेने दिलेले मान्यता होय. या जगातीक संघटनेचा हेतू व उद्देश फार उदात्त आहे. सर्व मानवजातीची सकस

आहारातील जीवणसत्वाची वाढ व जोपासना करून अन्न प्रश्न सोडवने या संघटनेला योग्य वाटते. संयुक्त राष्ट्रसंघात कृषक वर्गाची बाजु मांडून या वर्गाचे हितसंबध सुरक्षित ठेवण्यासाठी ही संघटना झटत असते. कृषी उत्पादन व कृषी मालापासून तयार होणाऱ्या वस्तुंच्या प्रक्रियेचा उद्योग आणि त्यांच्या व्यापारामध्ये शेतकरी वर्गाच्या हिताची जोपासना करणे व मार्गदर्शन करणे हे या संघटनेचे कार्य आहे. त्याकाळी या संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम डॉ. पंजाबराव देशमुखांनी केले. सुप्रसिध्द सहकार तज्ञ हॉवर्ड ए. कॉर्डन यांनी पंजाबरावांच्या कार्याची दखल घेवून असे म्हटले आहे की, डॉ. पंजाबरावांपेक्षा चांगली निवड ही संघटना करू शकली नसती.

**जपानी भात शेतीचा प्रचार व प्रसार :**

शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने आपन प्रगत तंत्राचा अवलंब केला पाहिजे हा विचार प्रभावी होता 1953 ला डॉ. पंजाबरावांनी आकाशवानी वरून भात उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांना एक अभिनव प्रयोगाची माहिती दिली. ही भात शेती ज्याठीकाणी भरपूर पाणी आहे त्यांनी या शेतीचा अवलंब करावा असे त्यांनी म्हटले होते. तेव्हा भारतात एकूण 19087 प्रात्यक्षिक प्रयोग क्षेत्र प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतात निर्माण केली गेली जपान पध्दतीने भात शेती कशी करावी याचे प्रशिक्षण देणारे 634 प्रशिक्षण केंद्र उघडली गेली. सरकारकडून ही शेती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले वेळप्रसंगी शेतकऱ्यांना यासाठी कर्ज देण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून भारतामध्ये भाताचे उत्पादन वाढले या यशस्वी प्रयोगामुळे डॉ. पंजाबराव देशमुख हे तांदूळ उत्पादनाच्या प्रश्नाचे तंज्ञ म्हणून ओळखले जावू लागले.

**कृषक समाजाची स्थापना :**

1955 ला कृषक समाजाची संघटना असावी हा त्यांचा विचार घेता संघटनेच्या माध्यामातुन प्रश्न तातडीने सुटतात त्यामुळे कृषीच्या प्रश्नाची चर्चा व सोडवणूकीच्या दृष्टीने नितांत गरज ते ओळखुन होते तिच्या विविध उदिष्टामध्ये शेतकऱ्यांच्या, सामाजीक, आर्थीक आणि सांस्कृतीक प्रश्नांचे अध्ययन करणे, आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देणे, नवनवीन प्रयोगाची महिती देणे, कृषी विषयक धोरणे आखणे, कृषी विषयक प्रदर्शनी, चर्चासत्रे, सम्मेलने आयोजित करणे, परस्परामध्ये सहाय्य प्रस्तापित करणे त्यातुन शेतकऱ्यांचे जीवन समृध्द करणे हा उदात्त हेतू. भारतीय कृषक समाज संघटनेचा होता.

**ताडगूळ महासंघाची स्थापना :**

ताडीपासून उत्कृष्ट गुळ तयार होतो. ह्याचे प्रयोग महात्मा गांधी यांनी वर्धेच्या आश्रमात यशस्वी केले होते. हा व्यवसाय खेड्यातील लोकांणा पर्यायी रोजगार उपलब्ध करून देऊ शकतो म्हणून तांडगुळ महासंघाची स्थापना करून ताडगुळ उद्योगाची प्रदर्शनी डॉ. भाऊसाहेबांनी भरवली होती. त्यांचे उद्घाटन डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी केले होते.

**अखिल भारतीय तेलबीज उद्योग संघटना :**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या गांधी ग्रामोद्योग मंदिरात डॉ. पंजाबराव देशमुखांनी कडू निबांच्या निंबोड्यापासून तेल काढण्याचा उपक्रम सुरू केला. या तेलापासुन गांधी ग्रामोद्योग मंदिरात साबन तयार करण्याचा उद्योग चालविला अश्याप्रकारे शेतीला पर्यायी व पुरक उद्योगाची जोड देण्याचा उदात्त हेतु होता.

**निष्कर्ष :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषिमंत्री असतानाचे कार्य महत्वपूर्ण आहे. कृषी मंत्रालयाव्दारे "सर्क्युलर लेटर्स" प्रकाशित करण्याची सुरूवात त्यांनी केली. भारतातील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या प्रगतीची जगाला माहिती व्हावी यासाठी दिल्ली येथे 1960 साली "जागतिक कृषी प्रदर्शनी " भरवली शेतकऱ्यांचे जीवन समृध्द करण्याचा त्यांचा ध्यास या सर्व कार्यातून दिसुन येतो म्हणूनच त्यांना भारतीय कृषक क्रांतीचे जनक म्हटले जाते शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेल्या असामान्य कार्याचे स्मरण म्हणून अकोल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. डॉ. पंजबराव देशमुखांनी जे कार्य केले ते अल्प घटकांसाठी नाही. ते तमाम आम जनतेसाठी होते ते सर्वासाठी होते. ते महाराष्ट्राच्या थोर परंपरेचे वारसदार आहेत त्यांनी सर्वच घटकांसाठी अगदी शेतकऱ्यां पासुन ते दीन दलीत, रिक्षाचालकांच्या चळवळीपर्यत कार्य केले म्हणूनच त्यांना समाजप्रवर्तक , शेतकऱ्यांचा उध्दारकर्ता, भारतातील थोर शिक्षणतज्ञ, समाजिक क्रांतीचा अग्रगण्य पुढारी म्हटले जाते. डॉ. पंजाबराव देशमुखांना जी मानाची पदे मिळाली त्यांचा त्यांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी उपयोग केला त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या अनेक संघटना स्थापन केल्या या संघटनांमुळे भारतीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत झाली डॉ. पंजाबराव देशमुखांची भारतीय घटनेमध्ये असलेले भुमिका सुध्दा महत्वाची आहे. जर भारताच्या घटनेमध्ये डॉ. पंजाबरावांसारखे टीकाकार जर नसते तर ही घटना मुक्या बहिऱ्यांची ठरली असती. असे गौरवोदगार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले होते. अश्या प्रकारे डॉ. पंजाबराव देशमुखांचे कार्य सामाजिक शैक्षणिक , राजकीय , सांस्कृतीक क्षेत्रामध्ये असामान्य आहे.

**संदर्भ :**


- **मोहिते उत्तमराव : जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख**
- **डॉ. कोलते वि.भि. : वैदर्भीय जनतेचे हृदयसम्राट डॉ. पंजाबराव देशमुख**
- **प्रा. शेजुळे भिमराव : डॉ. पंजाबराव देशमुख यांचे चरीत्र**
- **देशमुख कल्पना : डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान**